स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 07–10–2016** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **3.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| **4.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **5.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **6.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| **7.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| **8.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| **9.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| **10.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **11.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **12.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **13.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **14.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **2.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 580:– {लोककर्म झोन 01}

क्र. ६९ अंतर्गत सिंधी कॉलोनी खामला येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. सेठ कन्स्ट्रक्शन कं. यांची वाटाघाटीनंतर प्राकलनीय दरावर रु. ४९,९१,३८५/– रकमेच्या निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा व तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 581</u>:— प्रभाग क्र. ६०—ब दत्तात्रय नगर सक्करदरा येथील
<u>{लोककर्म झोन 05}</u> अंतर्गत रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी में. एस के. मेहता आणि कंपनी यांची प्राक्कलनीय दराची रू. २८,२४,७८३/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 582</u>:— प्रभाग क्र. ६१—अ अंतर्गत किर्ती नगर व वैभव नगर
<u>{लोककर्म झोन 05}</u> येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी में. एस. के. गुरबक्षाणी यांची प्राक्कलनीय दराची रू. २७,३२,८१९/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 583</u>:— प्रभाग क्र. 35 ब मधील पारडी भंडारा रोड ते (पोलीस चौकी)
<u>{लोककर्म झोन 08}</u> ते भांडेवाडी रोड पर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधकामाचे कामास्तव प्राप्त निविदाकार मे. आर बी. केवलरामानी यांचे प्राकलनीय दरापेक्षा 14 टक्के कमी दराची रु. 66,14,804/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 584</u>:— प्रभाग क्र. ६१ अ व ब येथील जनता गृह.नि.स.स. ख.नं.
<u>{लोककर्म झोन 05}</u> ४३/२, ४३/१० व ताजबाग ठाकूर प्लॉट येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण तीन निविदाकारक ची निविदांपैकी मे. एस.के. मेहता ॲन्ड कंपनी यांची प्राक्कलनीय दराची रू. २९,९९,१५६/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 585</u>:— प्रभाग क्र. ४९—ब अंतर्गत प्रोफेसर कॉलनी हनुमान नगर
<u>{लोककर्म झोन 03}</u> येथे सिमेंट कॉंक्रिट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. एस. के. गुरबक्षाणी यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १४.५० टक्के कमी दराची रू. ४२,३३,४१९/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 586</u>:— स्थायी समिती ठराव क्र. 312, दि. 21.07.2016 अन्वये
<u>{लोककर्म झोन 01}</u> विभागाने केलेल्या सुचनेप्रमाणे सदरहु प्रस्ताव कार्यालयास परत करण्यास स्थायी समितीने मंजुरी प्रदान केली होती. त्यानंतर विभागाद्वारे मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांना निविदा भरण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

प्रभाग क्र. 70 'ब' गोपाल नगर अंतर्गत संभाजीनगर, बंडु सोनी, ले—आउट, सुभाष नगर, लोखंडे नगर, गजानन नगर, नेल्को सोसा., सरस्वती विहार व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राकलनिय दरापेक्षा ३.५०% प्रतिशत ने जास्त असलेली रू. ४९,१९,६३४/— (एकोनपन्नास लक्ष एकोनवीस हजार सहाशे चौतीस) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 587</u>:— प्रभाग क्र. 25 ब येथे आर. टी. ओ. कार्यालया पासुन ते
<u>{लोककर्म झोन 02}</u> अग्रवाल बिछायत केन्द्र अग्रेसन रोड चे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. प्रेमचंद राचुमल हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 29,99,710/—( रूपये एकोणतीस लक्ष नव्यानऊ सातशे दहा रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्र''न विचारात घेणे हे काम पद क्रमांक 681(A22001330802) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 588</u>:— प्रभाग क्र. 14 (अ+ब) येथील धम्मदिपनगर व इतर ठिकाणी,
<u>{लोककर्म झोन 07}</u> सिमेंट कॉक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्यास्तव व भोले नगर व इतर ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव प्राप्त निपिदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 29,99,904/— पेक्षा 1.39 टक्के जास्त दराची निविदा वाटाघाटी नंतर प्राकलनीय दरावर स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 682 (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 589</u>:— प्रभाग क्र. ४७—ब तिरंगा चौक ते महीला महाविद्यालय
<u>{लोककर्म झोन 05}</u> पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी में. एस के. मेहता आणि कंपनी यांची प्राक्कलनीय दराची रू. ३४,३९,८३६/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 590</u>:— प्रभाग क्र. 19 (अ) येथील बारसेनगर, स्विपर कॉलोनी, {लोककर्म झोन क्र.07} ठक्करग्राम, बांग्लादेश व तांडापेठ येथे रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाच्या रु. 41,15,575/— रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 591</u>:— प्रभाग क्र. 19 (अ) येथील पाचपावली उड्डाणपुलाच्या,
<u>{लोककर्म झोन क्र.07}</u> ठक्करग्राम, ठक्करग्राम व बारसेनगर अप्रोच रोड येथे रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाच्या रु. 33,52,559/— रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील निविदाकाराने जर विहीत मुदतीच्या पहिले काम पुर्ण केल्यास प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने या निविदाकारास प्रकल्प व्यवस्थापक (पी.एम.सी.) म्हणून नियुक्त करण्यास हरकत नाही. या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 592</u>:— सिमेंट कॉंक्रीट रस्ते टप्पा III अंतर्गत नागपूर शहरातील
<u>{लोककर्म झोन क्र.07}</u> रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीट मध्ये बांधकाम करण्याकरिता विभागाने तयार केलेल्या ढोबळ प्राकलनिय राशी (Block Estimate) रु. 300.00 कोटीच्या कामाकरिता सविस्तार प्राकलने व कामाची निविदा तयार करणे (कंत्राटदाराच्या कार्यादेशापर्यंतची संपूर्ण कार्यवाही) याकरिता पी.एम.सी. (प्री टेंडर एक्टीव्हीटी) ची नियुक्ती करण्याकरिता निविदा बोलविण्यात आल्या असता मे. इंफ्राकिंग कन्सल्टींग इंजिनियरींग प्रा.लि. पुणे यांची 0.234 % दराची निविदा निम्नतम असून ढोबळ प्राकलनीय राशीचे अनुषंगात रु.70,20,000/— ची निविदा राशी अपेक्षित आहे. येणारा खर्च सादर निम्नतम दर 0.234 ने प्रत्यक्ष निव्वळ तांत्रिक मान्यता प्राप्त राशीवर आधारित राहिल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 593</u>:– प्रभाग क्र ८ ब मधील विविध ठिकाणी रस्त्याचे
{लोककर्म विभाग} डांबरीकरण करण्याचे कामास्तव निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा पैकी मे. ग्लोबल ईजिनिअरींग यांची प्राकलनीय दराची निविदा राशी रू. २९,९९,८९३/– (एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार आठशे त्र्यानंऊ फक्त ) रक्कमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 594</u>:– नागपूर महानगरपालिकेच्या विविध सेवा महानगर पालिकेच्या {सा.प्र. विभाग} नागरी सुविधा केंद्रांसोबतच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960/रजिस्ट्रार ऑफ सोसायटीज /धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या तसेच नागपूर महानगरपालिकेत नोंदणी केलेल्या संस्थांद्वारे देखील नागरीकांना प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करून देणे बाबत प्रस्ताव विचारात घेवून,

सद्यस्थितीत मनपाच्या प्रॉपर्टी टॅक्स भरणा, जन्म मृत्यू दाखले हया सेवा मनपाच्या 3 झोनमध्ये 3CFC मार्फत व मुख्यालयामार्फत दिल्या जात आहेत. उर्वरीत 7 क्षेत्रीय कार्यालयांत 7 CFC सुरू करणे प्रकीयेत आहे.

तथापी मनपाच्या सेवा जास्तीत जास्त ठिकाणी उपलब्ध करून दिल्यास नागरीकांना त्याचा फायदा होईल हया दृष्टीने नागरीकांना सेवा देणाऱ्या BSNL, विद्युत मंडळ च्या बिल भरणा केंद्रांची माहीती घेतली असता महाराष्ट्रराज्य वीज बिल स्विकार केंद्र असोसिएशन हया संस्थेच्या सदस्य प्रतिनिधीमार्फत BSNL व विद्युत मंडळ नागरीकांना बिल भरण्याची सेवा देते हे निदर्शनास आले.

शहरातील BSNLव विद्युत मंडळाच्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. अशा संस्थांना बिल भरण्याच्या सेवा देणाऱ्या वर नमूद संस्था शहरातील नागरीकांना प्रतिमाह टेलिफोन बिले, लाईट बिले भरण्याच्या माध्यमातून परिचीत आहेत, तसेच उक्त संस्थांना शासकीय कार्यालयांशी संबंधीत कार्यप्रणालींचा चांगला अनुभव आहे हे लक्षात घेता मनपाच्या सेवांची व्याप्तीउक्त संस्थांमार्फत वाढविणे उचित राहील अशी धारणा आहे.

सद्यस्थितीतBSNL व विद्युत मंडळा कडून वीज बिल भरणा उक्त संस्थामार्फत नागरीकांनी केल्यास रू.4/– ते 5/– प्रति व्यवहार (Per Transaction) एवढे शुल्क उक्त संस्था आकारतात असे कंत्राटदाराकडून निदर्शनास आले. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र विद्युत बिल स्विकार केंद्र असोसिएशनने त्यांचेशी संलग्न 7 संस्थांमार्फत मनपाच्या क्षेत्रीय कार्यालयात अशी सेवा देण्याबाबत ईच्छुक असल्याचे कळविले आहे. तरी मनपाच्या सेवा CFC बरोबरच उक्त संस्थामार्फत खालील अटी शर्तीच्या आधारे देणे योग्य होईल.

01. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960/रजिस्ट्रार ऑफ सोसायटीज /धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या तसेच नागपूर महानगरपालिकेत नोंदणी केलेल्या संस्थांना मनपाच्या सेवा देण्यासाठी NMC Service Provider (NMC SP) म्हणून नेमण्यात येईल.
02. या संस्थांना प्रत्यक्ष काम देण्यापूर्वी किमान तीन वर्षांचाताळेबंद मनपास सादर करावा लागेल.
03. NMC SP यांनाDemand ची प्रत प्रिंट करूनदेणे,Property Tax, Cash Collection करून पावती देणे ईत्यादी कामे देण्यात येतील व त्यानंतर त्यांना मनपाच्या ईतर सेवाक्रमाक्रमाने देण्यातयेतील.
04. या साठी मनपाच्या ई–गव्हर्नन्स शाखेतर्फे NMC SP यांना NMC च्या Software चेUser ID व Password उपलब्ध करून देण्यात येतील.NMC SP यांना प्रति CashCollection Transaction साठी रू. 5/–एवढी रक्कम मनपातर्फे देणे प्रस्तावित आहे.
05. प्रिंटींग व स्टेशनरी खर्च, संगणक, इंटरनेटचा खर्च व मेंटेनन्सचा खर्च हा NMC SP कडे राहील.

06. सुरूवातीला NMC SP यांचे कडून रू. 2 लक्ष रक्कम सुरक्षा ठेवBank Guaranty च्या स्वरूपातृम्हणून घेण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक महीन्यातील सरासरी जमा होण्याऱ्या रकमे इतकी सुरक्षा ठेव घेण्यात येईल. तसेच जानेवारी तेमार्च या कालावधीत 10% ने सुरक्षा ठेवीमध्ये वाढ करण्यात येईल.

07. MSEDCL, SNDL यांचे सोबत केलेल्या अटींच्या धर्तीवर NMC SP सोबत करारनामा करण्यात येईल.येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी वारंवार बैठका घेऊन मा. आयुक्तांचे निर्देशांनुसार आवश्यक ते बदल मुळ करारात करण्यात येतील. या करारनाम्याचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करण्यात येईल.

08. करानाम्यात बदल करण्याचा व नविन अटींचा समावेश करण्याचा अधिकार मा. आयुक्त मनपा, नागपूर यांना राहील.

09. NMC SP यांनाSoftware Installकरून देणे व त्यात उद्‌भवणाऱ्या अडचणी सोडविणेसाठी ई–गव्हर्नन्स शाखा तांत्रिकसल्ला देईल.

10. मनपातर्फे नियुक्त बँकेचे वाहन प्रत्येकNMC SP कडे संध्याकाळी 5.00 ते 6.00 चे सुमारास जमा झालेली रक्कम गोळा करेल व NMC SP यांनापावती देईल व ती पावती NMC SP ने दुसऱ्या दिवशी मनपाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

प्रायोगिक तत्वावर सुरू करण्याच्या पथदर्शी प्रकल्पामध्ये (Pilot Project) आलेल्या अनुभवानुसार शहरातील ईतर ठिकाणी अशी सेवा केंद्रे सुरू करणे प्रस्तावित आहे. या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्या नंतर मनपाच्या महासभेपुढे हा प्रस्ताव मंजुरीस्तव पाठवण्यात येईल.

सबब महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम 1960/रजिस्ट्रार ऑफ सोसायटीज /धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या तसेच नागपूर महानगरपालिकेत नोंदणी केलेल्या संस्थांद्वारे नागपूर महानगरपालिकेच्या सेवा प्रायोगिक तत्वावर देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय परिपुर्ण नाही असे या स्थायी समितीचे मत, सुरक्षा ठेवी बाबत विस्तृत माहिती विभागाने स्पष्ट केली नाही. हा प्रस्ताव विस्तृत धोरणासहित परत स्थायी समिती समोर सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 595 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर